N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** मारेगांव
**Year (वर्ष):** 2025
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0339
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/11/2025 15:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 14/10/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/10/2025
**Time From (वेळेपासून):** 17:58 बजे.
**Time To (वेळेपर्यंत):** 16:36 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/11/2025 **Time (वेळ):** 14:58 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 018
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/11/2025 14:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 10 किंमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सदरचे गुन्हयाचे घटनास्थळ हे इ,मारेगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अर्जुन घनवट

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 27/07/1973

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | IUDP COLONY,WASHIM,WASHIM,जुल्का,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अँन्टी करप्षन ब्युरो, यवतमाळ ,यवतमाळ,मारेगाव,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9623701706

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | इ.लो.से.कु.सुचिता कुमरे | | | 1. नवरगाव,मारेगाव,मारेगाव, यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-)"(मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराच्या 80 चलनी नोटा | 40,000.00 |
| 2 | इतर | घरगुती वस्तु | लहान मुलाच्या खेळण्याच्या | 0.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| | | | 500/ रूपयाच्या 80 नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

40,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अ◌ॅ.क.ब्युरो, यवतमाळ
कॅम्प:- मारेगांव
दिनांक - 01/11/2025
◌:◌: फिर्याद:◌:

मी अर्जुन घनवट, वय 37 वर्ष,पोलीस निरीक्षक,अ◌ॅन्टी करप्षन ब्युरो, यवतमाळ फिर्याद देतो की,मी पोलीस निरीक्षक म्हणून दिनांक 09/12/2024 पासून अ◌ॅन्टी करप्षन ब्युरो,कार्यालय यवतमाळ येथे नेमणुकीस आहे. दिनांक 14/10/2025 रोजी अ◌ॅन्टी करप्षन ब्युरो, कार्यालय यवतमाळ येथे हजर असताना तक्रारदार श्री.रतन ओमदेव पप्पुलवार, वय 37, धंदा षासकीय कंत्राटदार, रा. वसंतगंगा विहार, गोरक्षण जवळ, वणी, ता.वणी, जि. यवतमाळ यांनी ला.प्र.वि.यवतमाळ घटकात नेमणुकीस असलेले पोलीस हवालदार जयंत ब्राम्हणकर यांना फोनव्दारे त्यांची लाच मागणीची तक्रार असलेबाबत कळविले होते. त्यानंतर पोहवा ब्राम्हणकर यांनी ही बाब पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.यवतमाळ घटकाचे प्रभारी अधिकारी श्री.आष्टेकर यांना सांगितली होती. त्यांचे तोंडी आदेषाने आम्ही स्वतः दोन पंच बोलावुन पो.नि.श्री.मनोज ओरके व स्टाफसह मारेगांव येथे जावुन तक्रारदार नामे श्री.रतन पप्पुलवार यांची भेट घेतली होती. तेव्हा त्यांनी आम्हास ते सरकारी ठेकेदार असुन त्यांनी ग्रामपंचायत नवरगांव येथे त्यांनी शाळेच्या संरक्षण भिंतीचे काम केले असुन त्याचे देयकावर सही करण्याकरिता ग्रामपंचायत नवरगांव येथील सरपंच कु.सुचिता कुमरे यांनी माझेकडे दिनांक 23/09/2025 रोजी 80,000/- रुपये लाच मागणी करित आहेत अषी आमच्या व पंचाच्या समक्ष तोंडी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही त्यांना त्यांची लेखी तक्रार लिहुन देण्यास सांगितली. त्यांनी लिहुन दिलेली लेखी तक्रार पुढील प्रमाणे आहे."मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय यवतमाळ कॅम्प नवरगांव तालुका मारेगांव, जि. यवतमाळ येथे हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहत असुन माझे षिक्षण सिव्हील इंजिनिअर झाले असुन मला मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा लिहीता, वाचता, बोलता येते. मी आज रोजी लाच मागणीची पुढील प्रमाणे तक्रार देत आहे.
मी षासकीय कंत्राटदार असुन मी षासकीय इमारती, रोड, ड्रेनेज व ईत्यादीचे सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभाग तसेच ईतर विभागाचे षासकीय कंत्राट घेतो. जिल्हा परिषद बांधकाम विभाग यवतमाळ तर्फे जिल्हा परिषद प्राथमिक षाळा, नवरगांव, ता. मारेगांव येथील संरक्षण भिंत बांधकामकरणे करीता 7,65,100/- रूपयांचे किंमतीच्या कामांचा कार्यारंभ आदेष दिनांक 20/03/2020 रोजी सचिव ग्राम पंचायत नवरगांव, ता. मारेगांव यांना देण्यात आला होता. ग्रामपंचायत नवरगांव कडुन सदर मंजुर कामाकरीता ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मी सदर कामाची ई-निविदा भरली होती. सदर ई-निविदा प्रक्रीयेमध्ये मी यषस्वी कंत्राटदार ठरल्याने ग्राम पंचायत नवरगांवकडुन सदर कामाचा कार्यारंभ आदेष मला मिळाला होता. त्यानुसार मी सदरचे काम दिनांक 21/01/2022 रोजी सुरु करुन दिनांक 24/02/2024 रोजी मी पुर्ण केले आहे. सदर कामाचे नियमानुसार वेळोवेळी मोजमाप होवून त्याची नोंद घेण्यात आली असून काम पुर्णत्व प्रमाणपत्र सुध्दा प्राप्त झाले आहे. सदर काम हे जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, यवतमाळ यांचेकडुन ग्राम पंचायत नवरगांव यांना मंजुर असल्याने सदर कामाचा संपुर्ण निधी ग्राम पंचायत नवरगांव यांचेकडे देण्यात आलेला आहे. सदर काम नियमानुसार पुर्ण झाले असुन ग्रामपंचायत यांनी मला मंजुर बिलानुसार 6,23,336 /- रूपये देणे आहे. मी सदर

बिलाची रक्कम मागण्याकरीता सदर ग्रामपंचायत नवरगांव येथील सरपंच कु.सुचिता कुमरे यांना दिनांक
23/09/2025 रोजी ग्राम पंचायत नवरगाव येथील कार्यालयात भेटलो असता त्यांनी मला म्हटले की,तुम्ही मला
या कामाच्या बिलाच्या चेकवर सही करण्याचा मोबदला म्हणुन 80,000 रुपये द्या तेव्हाच मी चेकवर सही करणार...
नाही तर मी चेकवर सही करणार नाही.... असे म्हटले असता मी त्यांना नाईलाजाने "हो" म्हणुन तेथुन निघुन
आलो.
तरी कु.सुचिता कुमरे, सरपंच ग्राम पंचायत नवरगांव, ता. मारेगांव, जि. यवतमाळ हे मला जिल्हा परिषद प्राथमिक
षाळा, नवरगांव, ता. मारेगांव येथील संरक्षण भिंत बांधकामाच्या केलेल्या कामाच्या बिलाच्या चेकवर सही
करण्याकरीता 80,000/- रूपये लाचेची मागणी करीत आहेत. मला त्यांना लाचेची रक्कम दयावयाची नसल्याने मी
त्यांचे विरुध्द आज रोजी लाच मागणीची तक्रार देत आहे. माझी व कु.सुचिता कुमरे,सरपंच यांचेमध्ये दुष्मनी नसुन
देवाणघेवाणीचा उसणवारीचा कोणताही व्यवहार आमचे मध्ये नाही.. तरी कु.सुचिता कुमरे, सरपंच यांनी मला लाचेची
मागणी केल्यास व स्विकारल्यास त्यांचेवर कायदेषीर कार्यवाही करण्यात यावी ही विनंती. मी माझे तक्रारीसोबत
कामाचा कार्यारंभ आदेष,कामाचे मोजमाप रजिस्टरची छायांकीत सत्यप्रत यासोबत सादर करीत आहे.
माझी लेखी तक्रार पंचानी वाचुन पाहिली ती मी लिहील्याप्रमाणे बरोबर व खरी आहे." उपरोक्तपणे लेखी तक्रार व
त्यात नमुद कागदपत्रे श्री.रतन पप्पुलवार यांनी आम्हाला दिली व लोकसेविका सरपंच कुमरे या माझ्याकडे माझ्या
पुर्ण झालेल्या कामाचा चेकवर सही करण्याकरिता माझ्याकडे लाच मागणी करतील तेव्हा आपण मला पंचासह लाच
मागणीची पडताळणी करण्याकरिता लोकसेविका सरपंच कुमरे यांच्या ग्राम नवरगांव येथील घरी पाठवावे अषी विनंती
केली होती. त्यावरुन आम्ही तक्रारदार यांना पंचासह लोकसेविका कुमरे यांची भेट घेण्याकरिता तक्रारदार यांच्याकडे
व्हाॅईस रेकाॅर्डरसह रवाना केले होते. तक्रारदार यांनी शासकीय पंच क्र.01 यांचेसह लोकसेविका सरपंच कुमरे
यांची भेट घेतली व त्यांचे सोबत प्रलंबित चेकवर सही करण्याच्या अनुषंगाने चर्चा केली. चर्चे दरम्यान लोकसेविका
कुमरे यांनी तक्रारदार यांचेकडे 80,000/- लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. तक्रारदार व लोकसेविका कुमरे
यांच्यात झालेले संभाषणाबाबत सविस्तर पंचनामा तक्रारदार व पंचांच्या मदतीने दिनांक 14/10/2025 रोजी
करण्यात आलेला आहे.
तक्रारदार यांनी आम्हास विनंती केली की,लोकसेविका सरपंच कु.सुचिता कुमरे या माझ्याकडुन उदया दिनांक
15/10/2025 रोजी लाचेची रक्कम स्विकारु शकतात तेव्हा आपण उदया दिनांक 15/10/2025 रोजी सापळा
कार्यवाही आयोजित करावी.त्यावरुन आम्ही स्वतः,दोन शासकीय पंच व स्टाफसह मारेगांव येथे दिनांक
15/10/2025 रोजी सापळा कार्यवाही आयोजित करण्याकरिता मारेगांव येथे उपस्थित राहीलो होतो. दिनांक
15/10/2025 रोजी तक्रादार यांनी लोकसेविका कुमरे यांना फोनव्दारे संपर्क केला असता त्यांनी तक्रारदार यांना
वेळोवेळी भेटण्याचे ठिकाण सांगते तेथे तुम्ही या असे बोलुन भेटण्याचे ठिकाण न सांगितल्याने तक्रारदार यांना
लोकसेविका कुमरे यांची भेट घेता आली नाही. परंतु तक्रारदार यांनी लोकसेविका या पुन्हा त्यांचेकडे दिनांक
16/10/2025 रोजी लाचेची रक्कम स्विकारु शकतात त्यामुळे तुम्ही पुन्हा उदया दिनांक 16/10/2025 रोजी
सापळा कार्यवाही आयोजित करावी अषी तोंडी विनंती केली होती. त्यावरुन आम्ही पुन्हा दिनांक 16/10/2025
रोजी सापळा कार्यवाही आयोजित करावयाचे ठरविले होते. त्यानंतर आम्ही पुन्हा दिनांक 16/10/2025 रोजी पंच
व स्टाफसह मारेगांव येथे जावुन तक्रारदार यांची भेट घेतली. तक्रारदार यांनी लोकसेविका कुमरे यांना फोनव्दारे
संपर्क केला असता लोकसेविका कुमरे यांनी तक्रारदार यांना फोनव्दारे सांगितले की, मी मारेगांव येथे येत आहे
आल्यावर तुम्हाला फोन करुन कोठे भेटायचे हे सांगते अषा बोलल्या होत्या.परंतु लोकसेविका कुमरे यांनी तक्रारदार
यांना फोन करुन भेटण्याचे ठिकाण सांगितले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी आम्हा व पंचाना सांगितले की,
लोकसेविका कुमरे यांना संषय आला असावा त्यामुळे त्या भेटण्याचे ठिकाण सांगत नाहीत. त्यामुळे आपण सापळा
कार्यवाही काही दिवस स्थगित करावी. त्यानंतर दिनांक 29/10/2025 रोजी तक्रारदार यांनी आम्हाला फोनव्दारे
कळविले की, त्यांचा लोकसेविका सरपंच कुमरे यांचेसोबत संपर्क झाला असुन त्या आज रोजी मला भेटण्याकरिता
मारेगांव येथे येत असुन आपण सापळा कार्यवाही आयोजित करावी अषी विनंती केली होती. त्यानंतर आम्ही व
सरकारी शासकीय पंच व स्टाफसह मारेगांव येथे जावुन तक्रारदार यांची भेट घेतली.त्यावेळी तक्रारदार यांना
लोकसेविका कुमरे यांनी मारेगांव येथे भेटावयास बोलाविले होते.तक्रारदार यांनी लोकसेविका कुमरे यांना ग्रामसेवक
श्री.तिरपुडे यांचे मार्फतीने मारेगांव येथील हाॅटेल मेवाड येथे भेटावयास बोलविले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना
लाच रक्कम तसेच पंच क्र.01 यांचेसह हाॅटेल मेवाड येथे पाठविले व आम्ही स्वतः स्टाफ व पंच क्र. 02 यांचेसह
हाॅटेल मेवाड परिसरात सापळा लावला. ग्रामसेवक श्री.तिरपुडे हे काही वेळाने हाॅटेल मेवाड येथे आले व त्यांनी
तक्रारदार यांची भेट घेतली. ग्रामसेवक श्री.तिरपुडे यांनी सरपंच कुमरे या त्यांच्या का[illegible] घरी थांबल्या आहेत.
त्यांनी तुम्हाला तिकडे बोलाविले आहे असे सांगितले परंतु तक्रारदार यांनी खाजगी इसमाच्या घरी जाण्यास नकार

दिला. तसेच लोकसेविका सरपंच कुमरे या हाॅटेल मेवाड येथे तक्रारदार यांना भेटण्याकरिता आल्या नाहीत. त्यामुळे सापळा कार्यवाही तक्रारदार यांच्या विनंतीवरुन स्थगित करण्यात आली. दिनांक 29/10/2025 रोजी च्या सापळा कार्यवाही बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यानंतर दिनांक 30/10/2025 रोजी तक्रारदार हे अॅन्टी करप्षन ब्युरो कार्यालय,यवतमाळ येथे उपस्थित राहीले. त्यांनी आम्हास जबाब दिला की, लोकसेविका कुमरे यांना माझ्यावर संषय आलेला आहे.त्यामुळे त्या माझी भेट घेवुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत असे मला वाटते. त्यामुळे आपण त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी.याबाब तक्रारदार यांचा सविस्तर जबाब नोंदविण्यात आलेला आहे.

एकंदरीत तक्रारदार नामे रतन पप्पुलवार यांनी दिनांक 14/10/2025 रोजी दिलेल्या लेखी तक्रारीवरुन लोकसेविका सरपंच कु.कुमरे यांचेकडे तक्रारदार यांना पंचासमक्ष पाठवुन लाच मागणीची पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे 80,000/- रुपयांची लाच मागणी तक्रारदार यांच्या पुर्ण झालेल्या कामाच्या बिलाच्या चेकवर सही करण्याकरिता मागीतल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच दिनांक 15/10/2025, दिनांक 16/10/2025 व दिनांक 29/10/2025 रोजी लोकसेविका कु.कुमरे यांनी तक्रारदार यांची मारेगांव येथे भेट घेते असे सांगुण लाच रक्कम स्विकरण्याची व तक्रारदार यांना अदा करावायाच्या चेकवर सही करण्याची तयारी दर्षविली होती. परंतु तक्रारदार यांचेवर लोकसेविका कुमरे यांना संषय आल्याने त्यांनी तक्रारदार यांची भेट घेण्याचे टाळले आहे. परंतु दिनांक 14/10/2025 रोजी लोकसेविका सरपंच कु.कुमरे यांनी तक्रारदार नामे रतन पप्पुलवार यांचेकडे शासकीय पंचांच्या उपस्थितीत तक्रारदार यांच्या पुर्ण झालेलया कामाच्या रकमेचे देयकाच्या चेकवर सही करण्याकरिता 80,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे पडताळणीत निष्पन्न झाले आहे.

इ.लो.से.कु.सुचिता कुमरे,सरपंच ग्रामपंचायत नवरगांव ता.मारेगांव जि.यवतमाळ यांचे हे कृत्य कलम 7 लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये अपराध होत असल्याने त्यांचे विरुध्द सदर कलमान्वये गुन्हा नोंद करण्याकरिता मी सरकारतर्फे कायदेषिर फिर्याद देत आहे.

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये बरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SHYAM BHARAT WANKHADE(I (Inspector)) / PORN84060 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यारा नकार दिला):